# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
# MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

MUHS

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

**Tel:** (0253) 2539219 **EPABX:** 0253-2539100-300

**E-mail:** coe@muhs.ac.in / **Website:** www.muhs.ac.in

**डॉ. अजित गजानन पाठक**
एम.बी.बी.एस., एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र)
**परीक्षा नियंत्रक**

**Dr. Ajit Gajanan Pathak**
M.B.B.S., M.D. (Forensic Medicine)
**Controller of Examinations**


जा.क्र. मआविवि/एक्स-सी/2678/२०२० दिनांक : ०४/०5/२०२०

## परिपत्रक

मा. प्रति-कुलपती महोदय, मआविवि, नाशिक तथा मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य यांची मा. कुलगुरु, मआविवि, नाशिक यांच्याशी झालेल्या चर्चेअंती आपत्कालीन परिस्थितीमुळे पुढे ढकलण्यात आलेल्या आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या उन्हाळी-२०२० च्या पदवी व पदव्युत्तर परीक्षा घेण्याबाबत नियोजन करण्यासाठी गठीत केलेल्या समितीची बैठक दिनांक २८/०४/२०२० रोजी प्रा. डॉ. मोहन खामगांवकर, मा. प्रति-कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडीओ कॉन्फरंसिंगद्वारे संपन्न झाली. सदर समितीत विद्यापीठाच्या प्राधिकरणातील सर्व वैद्यकीय शाखांचे अधिष्ठाता तसेच, केंद्रीय परिषदेचे सदस्य डॉ. दर्शन दक्षिणदास, डॉ. कैलाश शर्मा व व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. एस. एस. सावरीकर उपस्थित होते. समितीने शिफारस केल्याप्रमाणे खालील निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१. विद्यापीठाच्या सर्व पदवी व पदव्युत्तर उन्हाळी-२०२० या परीक्षा पुढील सुचनेपर्यंत पुढे ढकलण्यात येत आहेत.

२. विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२० या परीक्षांचे वेळापत्रक महाराष्ट्र शासन, संस्था प्रमुख, अध्यापक, पालक व विद्यार्थ्यांशी परामर्ष करुन ठरविण्यात येईल.

३. विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२० परीक्षांचे अंतिम वेळापत्रक निश्चित करतांना केंद्रीय परिषदांशी समन्वय साधून, विद्यार्थ्यांना परीक्षेची तयारी करण्यासाठी पर्याप्त कालावधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

तसेच, सर्व संबंधितांना सुचित करण्यात येते की, परीक्षेच्या संदर्भात कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. विद्यापीठाच्या कोणत्याही परिपत्रकाची खातरजमा करण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर भेट द्यावी.

अजित पाठक

(डॉ. अजित गजानन पाठक)
परीक्षा नियंत्रक

H/C - S.S.
- circulate to all HODs.
- put up on college website (contact Dr. Kondhare).
8/5/2020